**परिपत्रक क्रमांक २९२ दिनांक ४/३/१९९८**

अनेक विभागीय/उप विभागीय न्सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयांमध्ये अनेक न्यासांचे अभिलेख उपलब्ध नसल्याचे निदेर्शनास आले आहे. न्यासांचे अभिलेखा हे कायमस्वरुपी जतन करण्याचा दस्तऐवज असून, न्यायिक प्रकरणांमध्ये त्यांची वेळोवेळी आवश्यकता भासते. अनेक न्यायिक प्रकरणामध्ये न्यासांचे मूळ अभिलेखा कार्यालयांत उपलब्ध न झाल्यामुळे प्रकरणे निकाली काढताना अडचणी आलेलया आहेत. त्यामुळे काही प्रकरणांमध्ये दस्तऐवजाअभावी न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर राहील.

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ७९ अ अ मध्ये गहाळ किंवा नाश पावलेल्या अभिलेख्यांची पुनर्बांधणीची तरतूद असून, त्यानुसार कार्यवाही करण्याचे अधिकार धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांना आहेत.

सबब, सर्व धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त यांनी त्यांच्या कार्यालयांतील नाश किंवा गहाळ झालेल्या न्यासांच्या अभिलेख्यांचा आढावा घेऊन तयाची पुनर्बांधणी करण्याचे काम तातडीने हाती घ्यावे. प्रत्येक कार्यालयात गहाह अथवा नाश पावलेल्या अभिलेख्यांची यादी तयार करुन ती तात्काळ मुख्यालयांस माहितीसाठी सादर करावी. तसेच मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ७९ अ अ मधील तरतूदींप्रमाणे विहीत कार्यपध्दती अवलंबून अभिलेख्यांची पुनर्बांधणीचे काम प्राधान्याने हाती घ्यावे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल धर्मादाय सह आयुक्त
यांचेमार्फत तात्काळ या कार्यालयांस सादर करावा.

(उ.धों.मालवणकर),
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

दिनांक :- ४/३/१९९८